## १५० वर्षांच्या गौरवशाली 'वंदे मातरम्' गीताचा

# डॉ. जे. जे. मगदूम फार्मसी कॉलेजमध्ये जयघोष

**जयसिंगपूर/प्रतिनिधी–**

'वंदे मातरम्' गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या महत्त्वाच्या निमित्ताने आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या निर्देशानुसार, डॉ. जे. जे. मगदूम फार्मसी कॉलेज, जयसिंगपूर येथे दिनांक ७ नोव्हेंबर २०२५ रोजी देशभक्तीपर वंदे मातरम् गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या विशेष कार्यक्रमामुळे महाविद्यालयाचे वातावरण देशभक्तीच्या भावनेने ओतप्रोत झाले होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. श्रेया मगदूम यांनी केले, तर प्रा. प्रणील तोरस्कर यांनी प्रास्ताविक सादर करून स्पर्धेचा उद्देश आणि वंदे मातरम् गीताचे १५० वर्षांचे



महत्त्व स्पष्ट केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शितलकुमार एस. पाटील यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. त्यांनी आपल्या भाषणात 'वंदे मातरम्' गीताचे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व विद्यार्थ्यांसमोर मांडले. विशेषतः बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी रचलेल्या या गीताने भारतीय स्वातंत्र्य चळवळीला कशी राष्ट्रीय चेतनेची प्रेरणा दिली आणि १५० वर्षांनंतरही त्याचे महत्त्व कसे टिकून आहे, हे त्यांनी नमूद केले.

विद्यार्थ्यांनी वैयक्तिक तसेच समूहगायनातून देशभक्तिपर गीतांचे अत्यंत प्रभावी सादरीकरण केले. या स्पर्धेत कु. श्रद्धा वाशीकर (बी.फार्मसी अंतिम वर्ष) हिने विजेतेपद पटकावले, तर कु. अर्जुन कुराडे (डी. फार्मसी प्रथम वर्ष) याला उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. प्राचार्य डॉ. शितलकुमार पाटील यांच्या हस्ते विजेत्यांसह सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमाला डॉ. जे. जे. मगदूम ट्रस्टचे चेअरमन डॉ. विजय मगदूम व व्हाईस चेअरपर्सन ॲड. डॉ. सोनाली मगदूम यांचे महत्त्वपूर्ण मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या शेवटी, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी एकत्र येऊन 'वंदे मातरम्' हे गीत सामूहिकरीत्या सादर केले. प्रा. सौरभ समडोळे व प्रा. स्नेहल पाटील यांनी या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले होते. उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.